**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 09/04/2026

**इलोसे** - सौ. मारिया जोस एस्तीबेरो, मुख्यध्यापिका, हॉलीक्रॉस, मराठी हायस्कुल, छावणी छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचेकडुन 300/- रुपये लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे छावणी छत्रपती संभाजीनगर येथे कलम-7, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | सौ. मारिया जोस एस्तीबेरो वय 52 वर्ष व्यवसाय नोकरी, मुख्यध्यापिका, हॉलीक्रॉस, मराठी हायस्कुल, छावणी छत्रपती संभाजीनगर रा. कॉन्व्हेंट रूम नं. 34, लक्ष्मी कॉलनी, हॉलीक्रॉस मराठी हायस्कुल परिसर, छावणी, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 500/- (पाचशे रुपये ) |
| लाच स्विकृती रक्कम | 300/- (तीनशे रुपये ) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री.चैनसिंग गुसिंगे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री.वाल्मीक कोरे, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना प्रवेश निरगम उतारा देण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 08/04/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील इलोसे मारिया जोस एस्तीबेरो मुख्याध्यापिका यांनी तक्रारदार यांना प्रवेश निर्गम उतारा देण्यासाठी 500/-रुपये लाचेची मागणी करून तडझोडी अंती 300/-रुपये लाच रक्कम स्वतः स्वीकारण्याचे पंचांसमक्ष मान्य केले.<br>लाच मागणी नंतर दिनांक 09/04/2026 रोजी सापळा कारवाई अजमावली असता आलोसे मारिया जोस एस्तीबेरो मुख्याध्यापिका हॉली क्रॉस, मराठी हायस्कुल, छावणी यांनी तक्रारदार यांच्या कडून प्रवेश निर्गम उतारा देण्यासाठी 300/- रुपये लाच रक्कम पंच साक्षीदार यांच्या समक्ष स्वीकारल्यानंतर पंचासमक्ष सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>इलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच इलोसे यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन छावणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केली असुन पुढील तपास ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर घटक करणार आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री चैनसिंग गुसिंगे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ राजेंद्र नंदिले, सचिन बारसे, मपोह आशा कुंटे, पो.अंम.सि.एन.बागुल, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.